RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❏ वर्ष - १ ❏ अंक -२५५ ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ गुरुवार दि.१४ डिसेंबर २०२३ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## जीते या हारे, सागर शर्माची पोस्ट चर्चेत सर्व घुसखोर 'भगत सिंग फॅन क्लब' पेजवरून संपर्कात




**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

संसदेत घुसखोरी केल्यानंतर देशभरात खळबळ उडाली होती. संसदेचे सुरक्षा कवच भेदून दोन तरूण प्रेक्षक गॅलरीपर्यंत पोहोचले आणि त्यांनी सभागृहात गोंधळ घातला. तसेच संसदेच्या बाहेर एक महिला आणि तरुणाने घोषणाबाजी केली. या सर्व तरुणांना ताब्यात घेतल्यानंतर दिल्ली पोलिसांनी चौकशीची चक्रे फिरविली असता आता नवी माहिती समोर आली आहे. संसदेत घुसखोरी करणारे सर्व तरूण सोशल मीडियावरील 'भगत सिंग फॅन क्लब' या पेजवरून एकमेकांच्या संपर्कात होते, असे पोलिसांनी सांगितले आहे.

**आधी म्हैसूरला भेटले**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे सर्व तरूण दीड वर्षांपूर्वी म्हैसूर येथे भेटले होते. सागर नावाच्या तरुणाने जुलै महिन्यातही संसदेत घुसण्याचा प्रयत्न केला होता. पण तो यशस्वी होऊ शकला नाही. १० डिसेंबर रोजी एक-एक करून सर्व जण आपापल्या राज्यातून दिल्ली येथे जमले. १३ डिसेंबरच्या दिवशी सर्वजण दिल्लीमधील इंडिया गेटजवळ एकत्र आले. त्यांना स्मोक कॅन देण्यात आले. अटक केलेल्या तरुणांकडून इतर लोकांचीही माहिती गोळा करण्यात येत आहे. या घुसखोरीचा मास्टरमाईंड कोण आहे? याचा तपास पोलिस करत आहेत. त्यातूनच राजस्थानमधील ललित झा नावाच्या तरूणाचे नाव समोर आले. सागर शर्मा नावाचा तरुण हा लखनऊमधील मानकनगर परिसरात राहणारा आहे. त्या डाव्या विचारांनी प्रभावित असल्याचे त्याच्या सोशल मीडियावरील पोस्टवरून दिसून येते. सागरचे फेसबुकवर दोन फेसबुक अकाऊंट आहेत. गेल्या काही महिन्यापासून हे दोनही अकाऊंट सक्रिय नाहीत. त्याच्या फेसबुक पेजवरून दिसून आले की, तो कोलकाता, राजस्थान आणि हरियाणामधील अनेक युवकांच्या संपर्कात होता.

सागर शर्माच्या कृत्यानंतर त्याचे कुटुंबिय घराला टाळे ठोकून अज्ञातवासात गेले आहेत. सागरच्या कुटुंबात आई-वडील आणि लहान बहिण आहे. हे कुटुंब मुळचे उत्तर प्रदेशमधील उन्नाव जिल्ह्यातील आहे. मात्र मागच्या २० वर्षांपासून ते लखनऊमध्ये राहत आहेत. सागरच्या कुटुंबियांनी सांगितले की, दोन दिवसांपूर्वीच सागर दिल्लीला गेला होता. तसेच त्याने संसदेत काय केले? याबद्दल आम्हाला माहिती नाही.

### सागर आणि नीलम भगत सिंग यांच्या विचारांनी प्रेरित

सागर शर्मा आणि डी. मनोरंजन (३५) यांनी प्रत्यक्ष संसदेत प्रवेश करून सभागृहात स्मोक कॅन फोडले. तर संसदेबाहेर नीलम (४२) आणि अमोल शिंदे (२५) या दोघांनी स्मोक कॅन फोडून घोषणाबाजी केली. नीलम आजाद या नावाने नीलमचे फेसबुक अकाऊंट आहे. ती नेहमीच राजकीय आणि सामाजिक विषयांवर सोशल मीडियावर भाष्य करताना दिसते. ११ नोव्हेंबर रोजीच तिने संसद आणि विधानसभेत महिलांना ५० टक्के आरक्षण असावे, अशी मागणी केली होती.

## संसदेच्या सुरक्षेवरून लोकसभेत गोंधळ, काँग्रेसचे ५ खासदार हिवाळी अधिवेशन संपेपर्यंत निलंबित




**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

लोकसभेच्या मुख्य सभागृहात दोन घुसखोरांना धुराच्या नळकांड्या फोडल्यामुळे नव्या संसदभवनाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यावरून आज ( १४ नोव्हेंबर ) लोकसभेत खासदारांनी गोंधळ घातला. त्याच पार्श्वभूमीवर असभ्य वर्तन केल्याप्रकरणी काँग्रेसच्या ५ खासदारांना हिवाळी अधिवेशन संपेपर्यंत निलंबित करण्यात आलं आहे.

संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी खासदारांच्या निलंबनाचा प्रस्ताव मांडला होता. काँग्रेस खासदार टीएन प्रतापन, हिबी इडन, एस जोथिमनी, रम्या हरिदास आणि डीन कुरियाकोस यांना हिवाळी अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी निलंबित करण्याचा प्रस्ताव प्रल्हाद जोशींनी मांडला. यावेळी लोकसभाध्यक्षांच्या खुर्चीवर असलेल्या बीजेडीचे भर्तृहरी महताब यांनी हा प्रस्ताव मंजूर केला.

## संसदेच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारची नाही तर..; लोकसभा अध्यक्षांनी दिली माहिती




**दि १४विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

संसदेच्या सुरक्षेत झालेल्या गंभीर चुकीमुळे दोन्ही सभागृहात विरोधी पक्षाचे खासदार प्रचंड गदारोळ करत आहेत. गुरुवारी लोकसभेत विरोधी पक्षाच्या खासदारांनी याच मुद्द्यावर सरकारकडे उत्तरे मागितली. सभागृहाचे कामकाज सुरू होताच त्यांनी घोषणाबाजी सुरू केली. यादरम्यान लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मोठे वक्तव्य केले. संसदेच्या सुरक्षेची जबाबदारी लोकसभा सचिवालयाची असल्याची माहिती त्यांनी दिली.

आज पुन्हा संसदेच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर चर्चा सुरू झाली. यावेळी ओम बिर्ला म्हणाले की, संसद सचिवालयाच्या कामात सरकार कधीही हस्तक्षेप करत नाही. संसदेच्या संपूर्ण परिसराच्या सुरक्षेची जबाबदारी लोकसभा सचिवालयची अशते. संसदेची सुरक्षा सरकारचे नाही, तर आमचे कार्यक्षेत्र आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. यावेळी विरोधांनी प्रचंड गोंधळ सुरू केला, त्यानंतर लोकसभेचे दुपारपर्यंत तहकूब करण्यात आले.

**काय म्हणाले राजनाथ सिंह?**

संसदेत घुसखोरीच्या घटनेबाबत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, या प्रकरणाचा सर्वांनी निषेध केला पाहिजे. आपण सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. द्वेष आणि अराजकता पसरवणाऱ्यांना पास मिळू नये, याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. जुन्या इमारतीतही कागद फेकण्याच्या आणि सभागृहात उड्या मारण्याच्या घटना घडल्या आहेत. यावरुन विरोधकांनी सभागृहात घोषणाबाजी आणि गदारोळ करण्याची गरज नाही.

**आठ सुरक्षा कर्मचारी निलंबित**

संसदेच्या सुरक्षेतील त्रुटींबाबत मोठी कारवाई करण्यात आली आहे. लोकसभा सचिवालयाने आठ कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. संसद भवनातील सुरक्षा कर्मचाऱ्यांशी संबंधित हे लोक आहेत. दरम्यान, १३ डिसेंबर २००१ रोजी संसद भवनावर दहशतवादी हल्ला झाला होता. कालच्या घटनेने २२ वर्षे जुन्या जखमा पुन्हा एकदा ताज्या केल्या आहेत.

## ६ मोबाईलमध्ये संसदेतील कटाचे धागेदोरे; फोन घेऊन पळालेला मास्टरमाईंड उलगडणार रहस्य?

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

संसदेत घुसखोरी करणाऱ्या चार आरोपींची सतत चौकशी सुरू आहे. बेरोजगारी, शेतकर्यांच्या समस्या आणि मणिपूरच्या समस्यांकडे सरकारचं लक्ष वेधण्यासाठी हे सर्व केल्याचं त्यांनी म्हटलं आहे. मात्र तपास यंत्रणा यावर पूर्णपणे विश्वास ठेवत नाही. आरोपींच्या मोबाईलची सविस्तर तपासणी करून त्यांचा नेमका काय हेतू आहे, याचा शोध घेतला जाईल. चारही आरोपींचे मोबाईल ललितकडे असून तो अद्याप फरार आहे. मोबाईलमधील पुरावे नष्ट करण्यासाठी तो सर्वांचे मोबाईल घेऊन पळून गेल्याचा तपास यंत्रणेला संशय आहे.

एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, अमोलने पोलिसांना सांगितलं की त्याने कल्याण येथून १२०० रुपयांना पाच रंगीत धूराचे स्प्रे विकत घेतले होते. सर्व आरोपींची विचारधारा एक सारखीच आहे. त्यामुळे त्यांनी सारख्याच गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांना कोणत्याही व्यक्तीने किंवा कोणत्याही संस्थेने पाठवलं होतं का? याचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरक्षा यंत्रणा करत आहेत.

या प्रकरणातील मास्टरमाईंडचा दिल्ली पोलीस शोध घेत आहेत. त्यासाठी छापेमारी केली जात आहेत. एका अधिकाऱ्याने सांगितलं की, कोलकाता येथील रहिवासी असलेला ललित झा हा शिक्षक असून तो या संपूर्ण घटनेचा मुख्य सूत्रधार आहे. चौकशीदरम्यान आरोपींनी सांगितलं की ते सोशल मीडियावर एकमेकांच्या संपर्कात आले होते, त्यानंतर सहाही जण फेसबुकवरील भगतसिंग फॅन पेजशी जोडले गेले.



ललित, सागर शर्मा आणि मनोरंजन वर्षभरापूर्वी म्हैसूरमध्ये भेटले होते, जिथे त्यांनी संसदेत प्रवेश करण्याची योजना आखली होती. नंतर त्याने नीलम आणि अमोल यांनाही सामील करून घेतले. या संपूर्ण प्रकरणाचे नेतृत्व ललित याने केलं. ललितचं शेवटचे लोकेशन राजस्थान-हरियाणा सीमेवरील नीमराना येथे सापडले. पोलिसांनी आधी सांगितले होते की, पाचही जण दहा डिसेंबरला जमले होते आणि गुरुग्राममधील विशाल शर्माच्या घरी थांबले होते. सध्या नीलम, मनोरंजन, अमोल आणि विशाल हे अटकेत आहेत. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेल आणि इतर सुरक्षा यंत्रणांनी त्याची चौकशी केली. ललित झा याने सर्वांना गुरुग्राममध्ये मीटिंगसाठी बोलावलं होतं. त्याने मोबाईलवर व्हिडीओ शूट करून सोशल मीडियावर अपलोड केला होता. सध्या ललित झा हा या सर्वांचा सूत्रधार असल्याचं दिसत आहे. उर्वरित चौघे ललितच्या संपर्कात होते. सुनियोजित कटाचा भाग म्हणून ललित सर्वांचे फोन घेऊन फरार झाला. ललित मोबाईलमधील कटाशी संबंधित पुरावे नष्ट करू शकतो, अशी भीती पोलिसांना आहे. ललित झा याचं शेवटचं लोकेशन नीमरानाजवळ होतं.

## केंद्र सरकारच्या दबावाखाली काम, निवडणूक आयोगाने आतातरी सुधारावे; काँग्रेसची टीका

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

निवडणूक आयोगावर किती दबाव आहे हे उच्च न्यायालयाने फटकारले त्यातून दिसते. लोकसभा सदस्याचे निधन झाले आणि लोकसभेचा कालावधी एक वर्षाचा असेल तर पोटनिवणूक घेतली पाहिजे तसेच विधानसभा सदस्याचे निधन झाले आणि सहा महिन्यांचा कालावधी असेल तर पोटनिवडणूक घेतली पाहिजे अशी संविधानात तरतूद आहे पण निवडणूक आयोगाने पुणे व चंद्रपूरची पोटनिवडणूक घेतली नाही. निवडणूक आयोग केंद्र सरकारच्या दबावाखाली काम करत आहे उघड आहे. निवडणूक आयोगाने आतातरी सुधारावे, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.




विधान भवन परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, ७३ व्या घटनादुस्तीनुसार दर पाच वर्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या पाहिजेत परंतु दोन-तीन वर्षे झाले राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच घेतलेल्या नाहीत, डेंग्युमुळे लोक मरत आहेत, जनतेची कामे होत नाहीत, भ्रष्टाचार बोकाळला आहे, जनतेच्या पैशाची लुट सुरु असून प्रशासक राज सुरु आहे. पिंपरी चिंचवडच्या आयुक्तांनी भ्रष्टाचाराचा कळस गाठला आहे, या आयुक्ताच्या भ्रष्टाचाराचे सर्व पुरावे आहेत. विधानसभेत हा प्रश्न मांडला होता, मुख्यमंत्री यांनी पत्र देण्यास सांगितले आहे, या भ्रष्ट आयुक्ताला तातडीने बडतर्फ करा अशी आमची मागणी आहे, असेही नाना पटोले यांनी सांगितले.

## आमदारांच्या सामूहिक छायाचित्रावरून नाराजी वेळ ठरवूनही मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री



**दि.१४ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

विधानसभेच्या सर्वच पक्षांतील आमदार छायाचित्र घेण्यासाठी गुरुवारी सकाळी १०.३० वाजता विधानसभेच्या पायरीजवळ हजर झाले. परंतु मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री छायाचित्रणासाठी येथे पोहोचले नाही. त्यानंतर हा कार्यक्रम स्थगित झाल्याने सर्वांनी नाराजी व्यक्त केली. परंतु दुपारी १२ वाजता अखेर छायाचित्र काढले गेले.

विधानसभेतील सर्व आमदारांना सकाळी १०.५० वाजताची वेळ छायाचित्र घेण्यासाठी दिली होती. त्यानुसार सगळ्याच पक्षाचे आमदार विधानसभेच्या पायरीजवळ हजर झाले. परंतु १० ते १५ मिनिटे झाली तरी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री तेथे पोहोचले नाहीत. त्यामुळे भास्कर जाधव, जयंत पाटील आणि सर्वच पक्षांच्या आमदारांनी विधान सभेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे नाराजी बोलून दाखवली. यानंतर छायाचित्रासाठी वेळ बदलून दुपारी १२ वाजताची वेळ दिली गेली. दरम्यान दुपारी १२ वाजता सर्व पक्षाचे आमदार पुन्हा येथे एकत्र आले. त्यानंतर येथे सर्वांचे सामूहिक छायाचित्र काढले गेले. यावेळी महिला आमदार, विविध आमदारांनी स्वतःचे वेगवेगळे छायाचित्रही काढून घेतले. यावेळी वेगवेगळ्या पक्षांच्या आमदारांमध्ये गप्पा-विनोद रंगले होते.

## पीएम किसान, नमो किसान महासन्मान योजनेतून एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही : धनंजय मुंडे

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

केंद्र सरकारच्या पीएम किसान व राज्य सरकारच्या नमो किसान महासन्मान योजनेतुन राज्यातील एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, यादृष्टीने कृषी विभाग कृतिशील असल्याची माहिती आज कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी विधानसभेत दिली.

या विषयावर आ.नानभाऊ पटोले, आ.बाळासाहेब थोरात आदी सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावर, उत्तर देताना धनंजय मुंडे म्हणाले की, पीएम किसान योजनेसाठी राज्यातून सुमारे ९६ लाख शेतकरी पात्र ठरले होते. राज्य सरकारने नमो किसान महासन्मान योजना घोषित केल्यानंतर केंद्राच्या नियमानुसारच या योजनेची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली होती. मात्र ई केवायसी पूर्ण



नसणे, बँक खाते आधार शी संलग्न करणे, अशा काही अटींची पूर्तता न होऊ शकल्याने यांपैकी १२ ते १३ लाख शेतकरी लाभापासून वंचित राहिले होते.

**६ लाख शेतकऱ्यांच्या वरील अटींची पूर्तता**

पीएम किसान योजनेच्या चौदाव्या हफत्याच्या वितरणानंतर ही बाब लक्षात आल्याने, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून कृषी, महसूल व भूमिअभिलेख आदी विभागांच्या समन्वयातून एक विशेष मोहीम राबवत आतापर्यंत सुमारे ६ लाख शेतकऱ्यांच्या वरील अटींची पूर्तता करण्यात अली आहे.

दरम्यान, जे शेतकरी अल्प भूधारक किंवा अन्य कारणांनी लाभार्थी ठरत नाहीत, त्यांचे नाव योजनेतून कमी करण्याची देखील कार्यवाही केली जात आहे. मात्र या कार्यवाहीचा परिणाम एकाही पात्र लाभार्थ्यावर होऊ देणार नाही, असे आश्वासन धनंजय मुंडे यांनी उपस्थित प्रश्नाच्या निमित्ताने दिली.

# पंडीत प्रदिप मिश्रा यांच्या शिवमहापुराण महाकथेची तयारी पूर्ण






## भाविकांसाठी राहणार पाच भव्य प्रवेशद्वार सह चहा, नास्ता, भोजनाची व्यवस्था



## उद्याला शहरातून निघणार भव्य दिव्य कलश यात्रा कथा १६ डिसेंबरपासून

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – श्री हनुमान चालिसा चॅरिटेबल ट्रस्ट व आ. रवि राणा, खा. नवनीत राणा यांच्यावतीने मुख्य नियोजक चंद्रकुमार जाजोदीया यांच्या मार्गदर्शनात १६ ते २० डिसेंबर दरम्यान छत्रीतलाव हनुमान गढी येथे आयोजित करण्यात आलेल्या पंडीत प्रदीप मिश्रा शिव महापुराण कथेची सर्व तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. तत्पूर्वी १५ डिसेंबरला जिल्हा स्टेडीयमवर दुपारी १२ वाजता कलश यात्रा निघणार आहे. या कलश यात्रेत मोठ्या संख्येने महिला सहभागी होतील अशी माहिती बुधवारी आयोजकांनी व पोलिसांनी कथास्थळी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

लाखो भक्त शिव महापुराण कथेचे श्रवण करण्यासाठी येण्याचा अंदाज असल्याने ७० एकर परिसरात ५ ते ६ भव्य मंडप उभारण्यात आले आहे. कथास्थळाच्या समोर २०० एकरात वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे. सोबतच कथास्थळी मुक्कामी राहणार्या भक्तांची पाचही दिवस रोज सकाळ, संध्याकाळ जेवण, चहा, नास्ताची निःशुल्क व्यवस्था करण्यात आली आहे. ज्या मुख्य मंचावरून पंडीत मिश्रा कथावाचन करतील तो मंच ८० बाय ४० फूट असून ८ फूट उंच राहणार आहे. त्यामुळे महाराजांचे सहज दर्शन भक्तांना होणार आहे. कथास्थळी भक्तांना सहज प्रवेश मिळावा म्हणून ५ प्रवेशद्वार असणार आहेत. या प्रवेश द्वारातून भक्त मंडळी प्रवेश करून आपल्या सोयीनुसार स्थान ग्रहण करून उत्तम प्रकारे कथा श्रवनाचा आनंद घेवू शकतील. कथास्थळी स्वच्छता राहावी यासाठी ५०० सफाई सेवक अहोरात्र सेवा देणार आहे. भाविक भक्तांच्या सोयीसाठी ३०० शौचालये व ५०० स्नानगृह निर्माण करण्यात आले आहे. १५ फिरती स्वच्छता गृहे राहणार आहे. स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी आरओ वॉटर प्लांट उभारण्यात आला आहे. ठिकठिकाणी ३०० नळ उभारून २४ तास पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. वैद्यकीय सेवा पथक, आपत्कालीन सेवा कक्ष निर्माण करण्यात आले असून या ठिकाणी ५० बेडचे हॉस्पीटल तसेच ५० डॉक्टर्स, १०० परिचारीका, युवा स्वाभिमान आरोग्यसेवक चमू, २५ रुग्णवाहिका २४ तास सेवारत राहणार आहे. ५ एकर परिसरात भव्य स्वयंपाक घर, भोजन कक्ष निर्माण करण्यात आला आहे. ५००० महिला व ५००० पुरुष अहोरात्र स्वयंसेवक महणून कार्यरत राहणार आहे. ३०० सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहे. अग्निशमन दलाला सज्ज ठेवण्यात येणार आहे. उत्तम प्रकाश व्यवस्थेसह अत्याधुनिक साऊंड सिस्टीम लावण्यात आली आहे. १५ डिसेंबरची कलशयात्रा जिल्हा स्टेडियम, इर्विन चौक, जयस्तंभ चौक, राजकमल चौक, राजापेठ उड्डाणपूल, कंवर नगर, फरशी स्टॉप, दस्तुर नगर, छत्री तलाव मार्ग श्री हनुमान गढी येथे पोहचेल. पत्रकार परिषदेला राणा दाम्पत्यासह, पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, चंद्रकुमार जाजोदीया व वेगवेगळ्या समित्यांचे प्रमुख हजर होते.

### दहा हजार स्वयसेवक व विविध समित्या देणार स्वयंस्फूर्तीनेसेवा

केंद्रीय समन्वय समिती, भोजन समिती, अन्न छत्र समिती, वाहतूक व वाहन तळ समिती, विद्युत व्यवस्थापन समिती, मनपा समन्वय व परिसर स्वच्छता समिती, वैद्यकीय सेवा समिती, सुरक्षा व्यवस्था समिती, मदत कक्ष समिती, आपत्कालीन – व्यवस्थापन समिती, परिवहन आदी समित्या अहोरात्र परिश्रम घेत असून जवळपास दहा हजार स्वयसेवक – स्वयंस्फूर्तीने सेवा देणार आहेत

### कथास्थळी जाण्याचा मार्ग

कथास्थळी जाण्यासाठी दस्तुर नगर चौक ते छत्री तलाव भानखेडा रोड, एसआरपी कॅम्प रत्नापुर रोड, चांदूर रेल्वे – पोहरा भानखेडा रोड, बडनेरा-कोंडेश्वर- भानखेडा रोड असे मार्ग राहणार आहे. छत्रीतलाव, दस्तुर नगर चौक येथे मदत व सहायता कक्ष व कथास्थळी नियंत्रण कक्ष राहणार आहे. बाहेरगावातील भक्तांना सहभागी होता यावे यासाठी एसटी महामंडळतर्फे विशेष बस गाड्या सोडण्यात येणार आहे.

### जिल्हा स्टेडियम ते हनुमान गढीपर्यंतभव्य कलश यात्रा

उद्या शुक्रवारी (ता.१५) दुपारी १२.३० वाजता जिल्हा स्टेडियम येथून भव्य कलश यात्रा निघणार असून या कलश यात्रेत १ लाख महिला सहभागी राहतील. यात कथावाचक प्रदीप मिश्रा यांच्यासह अनेक संत, महंत सहभागी होणार आहेत. ही कलशयात्रा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, जयस्तंभ चौक, राजकमल चौक, राजापेठ उड्डाणपूल, कंवरनगर, फरशी स्टॉप, दस्तुर नगर, छत्री तलाव मार्गे श्री हनुमान गढी येथे पोहोचेल.

# बहिरमच्या मनकर्णा देतात जलसंवर्धनाची साक्ष

## पुरातत्व विभागाचे व शासनाचे दुर्लक्ष



**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक शिरजगाव कासबा** : येथून १४ कि.मी अंतरावर असलेले श्रीक्षेत्र बहिरम बाबाच्या यात्रेचे स्थळ विविध धार्मिक व नैसर्गिक गोष्टींनी भाविकांचे श्रद्धास्थान ठरलेले आहे. पौराणिक काळापासून या स्थळाबद्दल अनेक कथा सांगितल्या जातात. येथील पर्वतावर असलेल्या बहिरम बाबाचे भव्य मंदिर व मंदिराच्या बाजूलाच असलेले भांडे तलाव तसेच मंदिर व भांडे तलावाच्या मागच्या बाजूस असलेले काशी तलाव मंदिराच्या खाली व यात्रा स्थळावर असलेल्या ५ मनकर्णा या सव बाॅबी बहिरम स्थळाचे पौराणिक व ऐतिहासिक महत्व स्पष्ट करणार्या आहेत तर भाविकांची या सर्वच स्थळावर गाढ श्रद्धा आहे.

शासनाच्या पर्यटन स्थळाचा बहिरमला 'ब' वर्गाचा दर्जा असल्यामुळे सर्वांनाच यात्रेच्या विकासाबद्दल मोठ्या अपेक्षा आहेत. परंतु, जिल्हा परिषदेच्या उदासीन धोरणामुळे या स्थळाच्या विकास थंड बस्त्यात आहे. येथील मनकर्णा म्हणजे बहिरम यात्रेला पाणीपुरवठा करण्याकरिता बांधलेल्या मोठ्या विहीरी. मोठ्या आकाराच्या असलेल्या मनकर्णा पाहताच त्याची भव्यता व उपयोगितेची खात्री पडते. पौराणिक स्थळामध्ये या मनकर्णाचा अंतर्भाव करता येतो.

पुरातन काळापासून यात्रेतील यात्रेकरूंसाठी पिण्याच्या पाण्यासोबतच पहाड पठारावरून पावसाळ्यात येणार्या पाण्याचे संवर्धन करणे हा सर्वात मोठा उपयोग या मनकर्णाचा आहे.

५ पैकी १ मनकर्णा तर जवळपास २५० फूट लांब तर जवळपास तेवढीच रुंद आहे. या मनकर्णाचे फाडीच्या दगडामध्ये बांधकाम झालेले आहे. जवळपास त्या मनकर्णावर ५० ते ६० खिराड्या होत्या. त्यावरूनच पूर्ण यात्रेकरू पाणी भरत होते. कालांतराने जि.प. च्या उदासीन धोरणामुळे या मनकर्णाची दुरावस्था झाली. खिराड्या लोकांनी काढून नेल्या तर फाळीच्या दगडात बांधलेली मनकर्णा जागोजागी खचली असल्यामुळे मनकर्णेच्या १०० फुट खोलीवर हा मलबा पडल्याने बहिरमचे वैभव असणारी मनकर्णा आज भाग्नावस्थेत पडली आहे. मनकर्णेत पावसाळ्यात पर्वतावरून येणारे पाणी नैसर्गिकरित्या साठवल्या जात होते. परंतु, कारंजा गावातील पाणीपुरवठा योजना व विविध रस्ते यामुळे पाण्याचे प्रवाह अडवल्या गेले.

मनकर्णा कोरड्या पडतात. भूगर्भातील जल पातळी वाढण्यात मोलाची मदत होत होती. परंतु, मनकर्णा भग्नावस्थेत असल्यामुळे व जिल्हा परिषदेने आज पर्यंत कधीच त्याचा उपसा न केल्याने मनकर्णा आज विद्रूप झाल्या आहेत.

### मनकर्णाचे संवर्धन आवश्यक

बहिरमचे पौराणिक व ऐतिहासिक महत्त्व दर्शविणार्या स्थळांचे पुनरूज्जीवन व संवर्धन आवश्यक आहे. त्यासाठी माझे सातत्याने प्रयत्न सुरू आहे. आ. श्रीकांत भारतीय यांना सविस्तर माहितीसह ते त्यांच्या कुर्हा गावी आले असताना चर्चा करून निवेदन दिले आहे. या महत्वाच्या विषयावर लक्ष देण्याची विनंती केली. परंतु, काहीच प्रतिसाद मिळाला नाही. पुन्हा पुन्हा त्या पत्राची प्रत पाठविली व आठवण दिली. सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. याचा खेद आहे. या ऐतिहासीक वास्तुंचे संर्वधन होणे आवश्यक आहे.

# राज्य शासनाने केंद्राकडे अमृत योजनेसाठी पाठपुरावा करावा

## आमदार सुलभा खोडके यांची विधानसभेत मागणी



**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**– अमरावती शहराला वर्ष २०५५ नियमित अखंडित जलपूर्ती करणाऱ्या अमृत-२.०अभियान अंतर्गत अमरावती वाढीव पाणीपुरवठा व योजनेच्या ९८५.४९ कोटींच्या प्रस्तावास ने राज्य शासनाच्या राज्यस्तरीय ल उच्चधिकार सुकाणू समितीने मान्यता क देऊन केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी २ शिफारस केली आहे. मात्र, या ह प्रस्तावात बदल करून अमृत-२ योजनेची पाइप लाइन ही मृदूपोलादाऐवजी सिमेंटची वापरण्याच्याप्रस्तावाबाबतच्या मुद्द्यावरून आ. नेट सुलभा खोडके अधिवेशनात चांगल्याचआक्रमक झाल्या. राज्य विधिमंडळाच्या नागपूर हिवाळी अधिवेशनात वर्ष २०२३-२४ च्या पुरवणी मागणीवरील चर्चा करीत असताना आमदार सुलभा खोडके यांनी अमरावतीच्या विकासाचे विविध मुद्दे उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले. राज्य शासनाने केंद्राकडे अमृत योजनेसाठी पाठपुरावा करावा, अशी मागणी त्यांनी केली.

अमरावती शहराला पाणी पुरवठा करणारी अप्पर वर्धा धरण मोर्शी ते नेरपिंगळाईपर्यंतची डब्लूटीपी पाइप पलाइन शिकस्त झाली आहे. या गुरुत्व वाहिनीचे ३० वर्षांचे आयुर्मान सन २०२४ मध्ये संपुष्टात येत आहे. वारंवार बा होणारी गळती व दुरुस्तीच्या कामांना २ चार-पाच दिवस यामुळे नागरिकांची दू गैरसोय होत आहे. अमृत २.० अभियान या अंतर्गत सिंभोरा हेडवर्क्स तेनेरपिंगळाई संतुलन टाकी ते पुढे तपोवन जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत मृदू पोलादी जलवाहिनी अंथरण्यास ९८५.४९ कोटींच्या खर्चाच्या प्रस्तावाबाबत आ. खोडके यांनी गत अधिवेशनात मुद्दा उपस्थित केला होता.

याबाबत राज्य शासनाच्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये मान्यता मिळवून केंद्र सरकारकडे शिफारस करणार असल्याचे आश्वासन मंत्री सावंत यांनी दिले होते. ५ जुलैला राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने ९८५.४९ कोटींच्या अमृत-२ वाढीव पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव मंजूर केला. तथापि, प्रस्तावात लोखंडी पाइप लाइन अंथरण्याऐवजी सिमेंटची पाइपलाइन टाकण्याचा बदल केल्याच्या माहितीवरून आ. खोडके यांनी आक्रमक भूमिका घेत ही पाइप लाइन मृदू पोलादाचीच वापरण्याची सूचना केली, ज्यामुळे वर्ष २०५५ पर्यंत या जलवाहिनीमध्ये कोणतेही अडथळे निर्माण होणार नाही त नागरिकांनाव नागरिकांना नियमित व मुबलक पाणीपुरवठा करणे – सोयीचे होईल, असे त्यांनी सभागृहाला अवगत केले.

# शिक्षणाचा गोवर्धन सारे मिळून उचलू या- डॉ. श्रीराम कोल्हे

## मातीचे शिलेदार तर्फे कुंभार समाजातील प्रतिभावंतांचा सत्कार

## डॉ. श्रीराम कोल्हे यांना समाजरत्न

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती अमरावती** – आजच्या युगात पालकांच्या अज्ञान आणि गरीबीमुळे मुले शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर फेकल्या जात असतील तर त्यासारखे दुसरे दुःख नाही. इतरांनी यासाठी काय केलं म्हणण्यापेक्षा आपण मदतीसाठी पुढे येऊ या. शिक्षणाचा हा गोवर्धन पर्वत सारे मिळून उचलू या. असे मनोगत ज्येष्ठ समाजसेवी व माजी सहाय्यक पशुसंवर्धन आयुक्त डॉ. श्रीराम कोल्हे यांनी व्यक्त केले. चंद्रपूर येथील सीडीसीसी बँकेच्या सभागृहात आयोजित मातीचे शिलेदार तर्फे कुंभार समाजातील गुणवंत विद्यार्थी व प्रतिभावंतांच्या सत्कार सोहळ्यात 'शैक्षणिक विकासात समाजाचे योगदान' या विषयावर ते बोलत होते, ते पुढे म्हणाले, दुसऱ्यांना वाईट म्हटले म्हणजे आपण चांगले होत नाही, तर आपण चांगले व्हावे लागते. त्यासाठी उघड्या डोळ्यांनी स्वप्न बघून त्याच्या पूर्ततेसाठी स्वतःला झोकून देण्याची वृत्ती अंगी बाणवावी लागेल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दौलतराव वरवाडे हे होते. यावेळी कवी अविनाश पोईनकर, सुधाकर उत्तुरवार, खिवराज प्रजापती, व्यंकटेश माडगुलवार, वैशाली गोटमवार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. श्रीराम कोल्हे यांना महाराष्ट्रातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या चळवळीसाठी समाजरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तर सामाजिक कार्यासाठी दौलतराव वरवाडे यांना समाजविभूषण पुरस्कार देण्यात आला. यावेळी मान्यवरांची समयोचित भाषणे झालीत. कार्यक्रमात चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील एकशे सहा गुणवंत विद्यार्थी व समाजातील सेवाव्रती व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. यात तन्वी गरपल्लीवार, प्रतीक्षा शेगमवार, आर्थिका पाठक, मयुरी खोबरे, अक्षय ठाकूर, उज्ज्वला खोबरे, सानिया वालदे, आर्या गोटमवार यांना प्रथम पुरस्कार तर स्नेहा ठाकरे, पलक व्यवहारे, चांदणी खोबरे, मयुरी खोबरे, अक्षय पातर, आर्यन बुरबांदे यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. याशिवाय डॉ. संस्कृती गरपल्लीवार, मिलन रामगुंडेवार, पृथ्वी उत्तुरवार, पूनम मंचलवार ,वैशाली कपाट, अश्विनी कपाट अशा अनेक पदवीधरांना रोख रक्कम, प्रशस्तीपत्र व पुस्तके देऊन गौरविण्यात आले. डॉ. ओमप्रकाश सोनोने, कैलास पुराणकर, किशोर पातर, अशोक ताटकंटीवार, मंगेश कपाट, ज्ञानेश्वर वरवाडे, आशिष चात्रेश्वार, संजय रामगुंडेवार, सुवर्णा चात्रेश्वार, शेखर रामगुंडेवार, भास्कर उत्तुरवार, अमित कोलुरवार यांना समाजभूषण पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. अश्विनी ताटकंटीवार, रामचंद्र ताटकंटीवार, मेहुल शेगमवार, अंशिका वलादे, किशोर चिकाने यांना क्रीडा पुरस्कार तर जय पातळे यास कलाभूषण पुरस्कार देण्यात आला. विमल येरावार, विलास उत्तुरवार, सुधाकर खोबरे, वसंत गाते, चंपत पातर, रामभाऊ खोबरे , रविंद्र गिरोले यांना सेवाव्रती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सूरज बुरबांदे, सोनल येरावार, प्रियंका इसलवार, नेहा ताटकंटीवार, वृषभ शेगमवार, सचिन बोरसरे, शुभम खोबरे, वेदांत कोटांगले यांचा नव्याने नोकरीस लागल्यामुळे सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. राजेश्री मार्कंडेवार व वंदना चात्रेश्वार यांनी केले. प्रास्ताविक अजय मार्कंडेवार यांनी तर अहवाल वाचन गजानन अमरोजवार यांनी केले. यशस्वीतेसाठी राजेश रामगुंडेवार, प्रशांत चात्रेश्वार, राकेश चात्रेश्वार, शरद मंचलवार, गणेश रामगुंडेवार, मुकेश ठाकूर, रविजी व्यवहारे, रामभाऊ बोरसरे, कमलेश व्यवहारे, प्रशांत मार्कंडवार, चंदू श्रीकोंडावार यांनी परिश्रम घेतले.



# जरांगे यांनी व्यक्तिगत टीका टिप्पणी करणे टाळावे; बच्चू कडूंनी टोचले कान

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :–** राज्य विधिमंडळा च्या हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यातील तिसऱ्या दिवशी म्हणजेच आज मराठा आरक्षणावर सभागृहात चर्चा सुरू आहे. मराठा आरक्षणा संदर्भातील २९३ च्या प्रस्तावावर बोलताना आमदार बच्चू कडू यांनी सर्वच पक्षातील नेत्यांवर टीकास्त्र डागले. त्यांनी जातीपातीच्या नावावर राज्यात कायदा व सुव्यवस्था बिघडवू नका असे म्हणत जर एवढे जातीवदी लोक सभागृहात काम करत असतील तर या सभागृहाचे पावित्र्य कसे राखले जाईल असे म्हणत नेत्यांचे कान टोचले.

पुढे बोलताना आमदार बच्चू कडू म्हणाले की, जातीपेक्षा हक्कापेक्षा हक्काची लढाई महत्वाची असते. शेतकऱ्यांना त्यांचा भाव मिळत नाही, मजुरांना मजुरी मिळत नाही. शेतकऱ्यांना जर भाव मिळाला तर सगळं प्रश्न मिटतील. परंतू शेतकऱ्यांसाठी ७५ वर्षांत कोणताच पक्ष काहीच करू शकत नाही हे दाखवून दिले. शेतकऱ्यांसाठी कुणीच उभं राहत नाही. माझ्यावर ३५० गुन्हे दाखल झाले. ४ ते ५ गुन्ह्यात मला कोर्टाने पाच- पाच वर्षांची शिक्षा सुनावली. शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून असे होणे माझ्यासाठी काही नवीन नाही असेसुद्धा यावेळी आमदार बच्चू कडू म्हणाले.

पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले की, जन्म झाला की, माणसाला जात आणि धर्म चिकटतो. तो मरेपर्यत कायम राहतो. जात सोडू नका, पण जातीवर वाद करू नका, जात कुणीच सोडली नाही पाहीजे. तशी तर जात ही विष आहे. कष्टकरी, शेतकऱ्यांसाठी जात हे विषच आहे. ज्या मजुरांने हे सभागृह बांधलं त्याला १०० रोज होता. तर इंजिनिअरांना ८०० रुपये. ही लुटीचे तंत्र आहे. जो जास्त कष्ट करेल त्याला लुटायचे. जो कमी मेहनत करेल त्याला जास्त दिल्या गेले. श्रीमंतानी अधिक श्रीमंत व्हावं आणि गरीबांनी अधिक गरीब व्हावं. मग गरिबाने श्रीमंताच्या घरी भांडी घासावी ही व्यवस्था आहे. आता व्यवस्थेला तोडण्याची ताकद आपल्या नाही म्हणून या व्यवस्थेपर्यंत आपण आलोय. आणि त्यावर आपली पोळी भाजायची आहे. असाही टोला बच्चू कडू यांनी सभागृहातील नेत्यांना लगावला.

प्रस्तावावर बोलताना कडू म्हणाले की, आरक्षणावरून नेते मोठे होणार आणि कार्यकर्ते संपून जाणार आहे. मोठे- मोठे नेते द्वेष पसरविणारे भाषणं करत असतील कसं होईल. अरे बाबासाहेबांनी स्वतःच्या शरीरात कधी जात शिरू दिली नाही. ते म्हणाले होते की, मी आधीही भारतीय आणि नंतरही भारतीय आहे. आणि याच महापुरुषांना आपण जातीपातीत अडकवत आहोत. पेटवून दिले पाहीजे सगळ्यांना खरं तर. बाबासाहेबांचा पहिला पुतळा एका मराठ्याने उभारला याचा गर्व आहे. महात्मा फुलेंनी पहिली शिवजयंती साजरी केली. जातीपातीचे बंधन तोडत त्यांनी सुरुवात केली. असा हा महाराष्ट्र होता. पण आता तसे राहले नाही. काही सभा मी ऐकल्या त्यामध्ये एकजण म्हणतो १६० आमदारांना



आम्ही पाडू, ही काय भाषा आहे. एका मोठ्या नेत्यांने असं बोलण ठीक आहे का? एखाद्या कार्यकर्त्यांने बोललं असतं तर समजू शकलो असतो. एकमेकांवर आरोप करा पण समाजावर, जातीवर बोलाल तर राख होऊन जाईल ना सगळं, मग कोण थांबवेल हे. आपण समजदार लोकांनी जातीवर बोललो तर महाराष्ट्र बेचिराख होईल अशी भीतीसुद्धा बच्चू कडू यांनी यावेळी बोलून दाखवली.

सध्या विविध सभांमधून मराठा म्हणजे अन्याय करणारी जमात उभी करून ठेवली. असं चित्र निर्माण करणं चुकीचे होईल. राजकारण तर होईल पण विष पाजून मुख्यमंत्री होऊ नका, अमृत पाजून मुख्यमंत्री व्हा, घरं जाळणाऱ्यांचे हातपाय तोडून टाका, ती घटना निषेधार्हच आहे. पण या सभागृहात कोणीच मराठा मुलांच्या आत्महत्येवर बोलला नाही याचा खेद आहे. ५० मराठा मुलांनी आत्महत्या केल्या. त्याचा उल्लेख कुणी केला नाही. योगेश नावाचा पोरगा पीएच. डी. झालेला होता. त्याच्या बापाने आत्महत्या केली होती, घर पडकं होतं. शिकून, शिकून नोकरी लागत नाही म्हणून त्याने आरक्षणाचा आधार पकडला. पण तेही मिळत नाही म्हणून आत्महत्या केली. मराठवाड्यात पिकांना भाव मिळत नाही. सगळ्याच शेतकऱ्यांची अवस्था वाईट आहे. त्या भागात त्याकडेही सरकारने लक्ष दिले पाहीजे.

मराठा समाजाच्या उपोषण कर्त्यांवर लाठीहल्ला केला. ही चुकीचे आहे. मी जरी सत्तेत असलो तरी सत्य महत्वाचे आहे. पण सत्तेत असतानाही ही भूमिका चुकीचे असे आम्ही मानतो. परंतू आता हात जोडून सभेतून विनंती करतो की, जरांगे पाटील यांनी व्यक्तीगत टीका टिप्पणी करणे टाळावे असाही सल्ला त्यांनी यावेळी जरांगे पाटील यांना दिला.

सभागृहात बोलताना आमदार बच्चू कडू म्हणाले की, मराठा हा शब्द एका जातीचा शब्द नाही. जर हा शब्द एका जातीचा शब्द असेल तर राष्ट्रगितातून हा शब्द काढला पाहीजे. लिळा चरित्रात आठशे वर्षापूर्वी मराठ्यांचा उल्लेख आहे. मराठा ही या मुलखाची ओळख आहे. अठरा पगड जातीचा असलेला प्रांत म्हणजे महाराष्ट्र. २०० वर्षापूर्वी महात्मा ज्योतीबा फुले आसूडमध्ये मराठा शब्दाचा वापर केला. आता महात्मा ज्योतिबा फुलेंना तुम्ही खोटे ठरवता का असा सवालही त्यांनी यावेळी केला.

# छगन भुजबळ महाराष्ट्रला लागलेला कलंक, बीडची दंगल त्यांनीच घडवली : मनोज जरांगे

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक छत्रपती संभाजीनगर :**छगन भुजबळ महाराष्ट्रला लागलेला कलंक आहे. याला फक्त पाहुण्याचा पुळका येतो, असा हल्लाबोल मनोज जरांगेंनी केला आहे. अंतरवलीतील लोक घरात कोंडून मारले, तेव्हा हा झोपला होता का? भेदभाव करत नाही तर मग अंतरवालीत का आला नाही, असा सवाल मनोज जरांगेंनी गेलाय. बीडची दंगल यांनीच घडवून आणली. याला बळ देऊ नका, असे म्हणत मनोज जरांगेंनीराज्य सरकारला आवाहन केलं. मागील काही दिवसांपासून आरक्षणावरुन मनोज जरांगे आणि छगन भुजबळ यांच्यामध्ये खडाजंगी सुरु आहे. आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. आज छत्रपती संभाजीनगर औरंगाबाद) येथे भाषणादरम्यान जरांगे यांनी भुजबळांवर निशाणा साधला.

**भुजबळांना फडणवीसांचं बळ – जरेंगांचा आरोप**

छगन भुजबळ यांना बळ देऊन मराठ्यांच्या विरोधात जाऊ नका, यांचं एकूण तुम्ही आमच्या लोकांना अटक केली. यांचं ऐकून मराठ्यांच वाटोळं करू नका. भुजबळांनी महाराष्ट्र सदन खाल्लं, तरी केस तुम्ही मागे घ्यायला लागलेत. सगळा महाराष्ट्र खाल्ला आहे. फडणवीस साहेब बुजबळांना बळ द्यायला लागले असं



आम्ही शांततेच आव्हान करतो आणि तुम्ही लोकांना भडकवतात. तुम्ही जर असंच करत राहिले तर आम्हाला मोठं आंदोलन उभं करावं लागेल. हे मराठ्यांच्या किती हिताचे आहेत, हे मराठयांना माहीत आहे. सगळं खाल्लं. फडणवीस साहेब याला बळ देत असल्याने भाजपसाठी हा चांगला संदेश नाही. आरक्षण ही केंद्र आणि राज्याची सुविधा आहे. यांचं ऐकू नये. हा माणूस प्युअर जातीयवादी आहे. हा लहान जातींना सुद्धा आरक्षण खाऊ देत नाही, असे जरांगे म्हणाले.

दिसत आहे. भुजबळ बोलला त्यामुळेच गावा गावात जातीय तणाव निर्माण होत आहे, असे मनोज जरांगे म्हणालेत.

# गोळी मारली जाईल, सभागृहात पोलिसांचा अहवाल दाखवत भुजबळांचा मोठा दावा

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :–**मराठा आरक्षणा वरून राज्यातील प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा बनत चालला आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण हवे असल्याने छगन भुजबळांनी नकार दिला आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाला आपला विरोध नसून ओबीसीतून आरक्षण देण्यास त्यांनी कडाडून विरोध केला आहे. गेल्या काही दिवसांत मनोज जरांगे पाटील विरुद्ध छगन भुजबळ यांच्यातील संघर्ष अवघ्या महाराष्ट्राने पाहिले. मनोज जरांगेंनी छगन भुजबळांवर केलेले आरोप आज त्यांनी सभागृहासमोर मांडले. तसाच,




एक गंभीर आरोप केला आहे.

छगन भुजबळ यांनी आज मराठा आरक्षणप्रश्नी राज्यात निर्माण झालेल्या परिस्थितीवर सभागृहात भाष्य केलं. जवळपास पाऊणतास त्यांनी आज सभागृहात त्यांचं मत मांडलं. यावेळी त्यांनी मनोज जरांगेंवर टीकाही केली. तसेच, त्यांनी काही वृत्तांची कात्रणे सभागृहासमोर ठेवले. यात आमच्या हातात दंडुके, सरकारला पायाखाली तुडवू शकतो. भुजबळांनाही पाहून घेऊ, ही मनोज जरांगे पाटलांची वृत्तपत्रात छापून आलेली वक्तव्ये त्यांनी सभागृहात वाचून दाखवले. २४ डिसेंबला नाशिकला भुजबळ नॉलेज सिटी, भुजबळ फॉर्म ज्यांना कोणाला पाहायचं आहे, त्यांनी नावे कळवावी, हे पत्रकही त्यांनी वाचून दाखवलं. ते म्हणाले की, याचा अर्थ माझ्यावर हल्ला करण्याची तयारी सुरू झाली. प्रकाश सोळंके, संदीप क्षीरसागरचं झालं, आता माझ्यावरही हल्ला होणार. सकाळी उठलो आणि पाहिलं की सुरक्षा वाढवली आहे. सुरक्षा का वाढवली याची चौकशी केली तेव्हा पोलीस म्हणाले की वरून इनपूट आलेलं आहे की भुजबळांना गोळी मारली जाईल. पोलिसांचा अहवाल आहे, असा दावाही त्यांनी केला.हरकत नाही. मी मरायला तयार आहे. माझा मराठा आरक्षणाला विरोध नाही. त्यांना वेगळं आरक्षण द्या. आज छगन भुजबळ आहे, प्रकाश सोळंके झाला. उद्या मी असेन. आपण त्यावर गप्प बसणार का? कोणी त्याचा निषेध करणार नाही? कोणी बघायला जाणार नाही? आज महाराष्ट्रसमोर हाच माझा प्रश्न आहे, असे छगन भुजबळ म्हणाले.

# नियुक्तीवरून नाराजी सत्र युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिले राजीनामे



**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** युवासेनेच्या काही स्थानिक पदाधिकाऱ्यांनी दुसऱ्या पक्षातील पदाधिकाऱ्यांना युवासेनेत आणून त्यांना आमच्या हक्काची पदे मिळवून दिली, असा आरोप युवासेनेच्या नाराज पदाधिकाऱ्यांनी केला आहे. अनेक वर्षे निष्ठावंत राहून विविध आंदोलनात सहभागी राहणाऱ्या अनेक युवा सैनिकांना या नियुक्त्यांमध्ये डावलण्यात आल्याचे सांगत नाराज पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदांचे राजीनामे दिले आहेत. जिल्हासमन्वय धीरज खोडस्कर, चेतन जवंजाळ, उपजिल्हाप्रमुख शिवराज चौधरी यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदांचे राजीनामे देण्यात येत असल्याचे पत्रपरिषदेत सांगितले. युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांची काल नियुक्ती करण्यात आली. मात्र या नियुकत्यामध्ये डावलण्यात आल्याचा आरोप पदाधिकाऱ्यांनी केला. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर अनेक आंदोलनात सहभागी झालेल्या युवा सैनिकांना आज दुसऱ्या पक्षातून युवा सेनेत दाखल झालेल्या काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या हाताखाली काम करावे लागत असून संबंधित पदाधिकाऱ्यांनी आपल्या जुन्या युवक काँग्रेसमधील समर्थकांचा युवासेनेत प्रवेश करून त्यांना महत्त्वाची पदे वाटल्याचा आरोप सुद्धा यावेळी करण्यात आला.राजीनामे दिल्यानंतर आता पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे तसेच वरुण सरदेसाई यांची भेट घेणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी राजीनामा दिलेले विपिन टोंगे, शुभम चौधरी, नकुल राणे, प्रतीक राणे, मोरेश्वर इंगळे, प्रमोद धनोकार, स्वराज शेंडे, मयूर गव्हाणे, यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# धार्मिक स्थळांवरील लाऊडस्पीकरवर बंदी

## मुख्यमंत्री होताच मोहन यादव यांचा मोठा निर्णय

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक भोपाळ :** –मध्य प्रदेशचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री मोहन यादव यांनी पदभार स्वीकारताच एक मोठा निर्णय घेतला आहे. मध्य प्रदेशातील धार्मिक स्थळांवर मोठ्या आवाजात लाऊडस्पीकर वाजवण्यास मुख्यमंत्र्यांनी बंदी घातली आहे. राजधानी भोपाळमध्ये झालेल्या पहिल्या कॅबिनेट बैठकीत मुख्यमंत्र्यांनी हा निर्णय घेतला. मुख्यमंत्री डॉ.मोहन यादव यांनी आज भोपाळमध्ये मंत्रिमंडळाची पहिली बैठक घेतली. पहिलाच निर्णय त्यांनी मोठा घेऊन लाऊडस्पीकर विरोधात कठोर भूमिका घेतली.

**मोहन यादव यांचा मोठा निर्णय**

भोपाळमध्ये कॅबिनेटची बैठक झाली. मुख्यमंत्र्यांना तिथे जायला उशीर होत होता. त्यामुळे महाकालची पूजा आणि आरती झाल्यानंतर ते लगेच भोपाळकडे रवाना झाले. महाकालचे दर्शन घेतल्यानंतर मुख्यमंत्री मोहन यादव म्हणाले, शपथ घेतल्यानंतर मी बाबा महाकालच्या दरबारात आलो आहे. माझ्यावर नवीन जबाबदारी देण्यात आली आहे, म्हणून मी बाबा महाकाल यांचा आशीर्वाद घेण्यासाठी इथे आलो. कॅबिनेट बैठकीसाठी मी भोपाळला रवाना होत आहे. यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली डबल इंजिनचे सरकार मध्य प्रदेशात आणखी प्रगती करेल.



दरम्यान, मध्य प्रदेशातील धार्मिक स्थळांसह सर्वत्र लाऊडस्पीकरच्या वापरावर मुख्यमंत्र्यांनी बंदी घातली आहे. मर्यादित आवाज सोडायला हवा, असे ते यावेळी म्हणाले. यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. लाऊडस्पीकर तपासण्यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये पथके तयार करण्यात येणार आहेत. मुख्यमंत्रिपदाचा पदभार स्वीकारण्यापूर्वी डॉ.मोहन यादव यांनी त्यांच्या जन्मगावी उज्जैन येथे जाऊन तेथे महाकालचे दर्शन घेतले. तिथून ते थेट भोपाळला परतले आणि त्यांनी बैठक घेतली.

# राज्यात लाडली बहना योजना लागू करण्याची मागणी

**दि१४विदर्भ प्रजासत्ताक धारणी–** राज्यातील हातमजुर महिलांची आर्थिक स्थिति बघता मध्यप्रदेशातील लाडली बहना योजना महाराष्ट्रातही लागू करण्यात यावी अशी मागणी अखिल भारतीय बलई समाजाच्या महाराष्ट्र संघटनेच्या महीला प्रदेशाध्यक्ष प्राप्ती माने यांनी एका निवेदनातून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.सद्यस्थितीत राज्यातील अनेक घटकांतील महिलांना स्थानिक पातळीवर कायमस्वरूपी रोजगार मिळत नाही. आर्थिकदृष्टया कमकुवत महिलांना सरकारने मदतीचा हात द्यावा. राज्यातील आदिवासी भागातील महिलांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. मेळघाटातील अनेक गावातील महिलांना आजही रोजगारासाठी जंगलात वणवण भटकावे लागते. सध्या राज्यात निराधार महिलांसाठी त्यांच्या आर्थिक विकास करण्यासाठी मध्यप्रदेशातील लाडली बहना रामबाण ठरलेली आहे. या पार्श्वभूमिवर महाराष्ट्रात मध्य प्रदेशप्रमाणे लाडली बहना योजना लागू करून महिलांना सहकार्य करण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

# आणि भुंकणाऱ्यांना भूंकण्याची संधी मिळते

## संजय शिरसाटांची संजय राऊतांवर जहरी टीका

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :–** आगामी लोकसभा निवडणुकीत शिंदे यांच्या शिवसेनेचे सर्व खासदार भाजपच्या कमळ चिन्हावर निवडणूक लढवणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनीही याबाबत सूचक विधान केले होते. यावर आता शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. शिंदे गटाचे खासदार भाजपाच्या चिन्हावर निवडणूक लढवणार नाहीत. संबंधित माहिती चुकीची आहे, असे विधान शिरसाट यांनी स्पष्ट केले. ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.शिवसेनेचे खासदार भाजपाच्या चिन्हावर निवडणूक लढणार असल्याच्या चर्चेबाबत विचारले असता संजय शिरसाट म्हणाले, तुम्ही माहिती मिळवण्यासाठी स्त्रोत कुठून आणला? हे मला माहीत नाही. पण कमळाच्या चिन्हावर शिवसेनेचे खासदार निवडणूक लढणार, अशी जी बातमी चालू आहे, ती मुळात चुकीची आहे. प्रसारमाध्यमंही सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार बातम्या चालवतात आणि भुंकणाऱ्यांना भूंकण्याची संधी मिळते. मग ते भुंकायला सुरुवात करतात. मग त्यांना निष्ठा येते. त्यांना सर्व गोष्टींची आठवण येते. संजय शिरसाटांनी पुढे नमूद केले की, मुळात शिवसेना प्रमुखांनी आम्हाला लढायला शिकवले आहे. रडायला शिकवले नाही. त्यामुळे आमचे सर्व खासदार हे शिवसेनेच्या धनुष्यबाण या चिन्हावरच निवडणूक लढणार आहेत. यात निवडणूक आयोग किंवा सर्वोच्च न्यायालयात गेलो नसतो.



काही शंका नाही. आम्ही भाजपबरोबरची २५ वर्षांची युती पुन्हा सुरू केली. आम्हाला तिकडे जायचे असते किंवा आम्हाला भाजपच्या चिन्हावर लढायचे असते तर एवढा खटाटोप करायची गरज काय होती? आम्ही आम्ही थेट भाजपमध्ये गेलो असतो. पण आम्हाला शिवसेन ाप्रमुखांनी दिलेली शिकवण आणि विचार जोपासायचे आहेत. त्यामुळे आमचा पक्ष कधीही भाजपमध्ये विलीन होणार नाही असे शिरसाट म्हणाले.

# श्रीरामांच्या आजोळी अक्षत कलश पूजन

## भक्तिमय वातावरणात पार पडला स्वागत समारंभ, संतांचा मेळावा

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक तिवसा :** श्रीराम जन्मभूमी अयोध्या येथील मंदिर उद्घाटन व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमंत्रणाचा अक्षत कलश अयोध्येवरून जिल्ह्यात आला आहे. या कलशाचे पूजन प्रभू श्रीरामांचे आजोळ असलेल्या विदर्भातील अंबिकापूर अर्थात श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथे बुधवारी झाले.कालिदासांच्या 'रघुवंशम् काव्यात रामांची आजी, अज राजाची पत्नी, राजा दशरथाची आई इंदुमती यांचे माहेर अंबिकापूर तथा कौंडण्यपूर असल्याचा दाखला



दिलेला आहे. याचा उल्लेख करीत रुक्मिणी पीठाचे पीठाधीश्वर जगद्गुरू रामानंदाचार्य राजराजेश्वर माउली यांनी ही माहिती धर्मसभेत दिली. येत्या २२ जानेवारीला श्रीराम मंदिर उद्घाटन सोहळ्याच्या दिवशी सर्वांनी मंदिरात व घरी पूजापाठ, नाम संकीर्तन, आरती व घरोघरी दिवे लावून दिवाळी साजरी करावी, असे आवाहन विश्वहिंदू परिषदेच्या वतीने करण्यात आले. यावेळी अखिल भारतीय संत समाजाचे मध्यप्रदेश येथून आलेले संत राधे महाराज यांच्यासह साधू व शेकड़ो नागरिक उपस्थित होते.

# मुख्यमंत्री शाश्वत सिंचन वैयक्तिक शेततळे योजनेचा लाभ घ्या !

## पंचायत समिती राबविणार योजना



अरुण जोशी

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्यात विविध भागांतील पावसाचे आगमन व असमान वितरण आणि पावसातील अनियमित येणारे खंड, या प्रमुख आपत्ती येत असतात. यामुळे सिंचनाअभावी मोठ्या प्रमाणात घट येते. अशात मुख्यमंत्री शाश्वत सिंचन वैयक्तिक शेततळे योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ओढे, नदी, नाले इत्यादीद्वारे वाहून जाणारे पाणी त्याची साठवणूक करण्याकरिता शेतावर शेततळ्यासारखी पायाभूत सुविधा उभी करण्यास चालना देणे हा एक उपाय आहे. शेतकऱ्यांना शेततळे बर खोदण्याकरिता अनुदान देय आहे.याकरिता मुख्यमंत्री शाश्वत कृती कृषी सिंचन योजनेंतर्गत व्यक्ती क्षेत्र ही योजना राबविण्यात येत आहे. लाभार्थी शेतकऱ्यांकडे स्वत:च्या नावावर किमान एक एकर जमीन असणे आवश्यक आहे. शेततळ्याला लागणारी जागा शेतकऱ्याने विनामूल्य द्यायची आहे..

मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनांतर्गत विविध आकारमानाच्या शेततळ्यासाठी कमान रक्कम ७५ हजार रुपये अनुदान देय आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ७/१२, ८अ, आधार कार्ड, बँक पासबुक आदी माहिती घेऊन पोर्टलवर अर्ज करायचा आहे. पंचायत समितीच्या माध्यमातून राबविला जाणार आहे. या योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन तालुका कृषी अधिकाऱ्यांनी केले आहे.

### शेततळे करणार क्रांती

सोयाबीन ,तूर उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतीसाठी सिंचनाची व्यवस्था व्हावी यासाठी शेततळ्यांची योजना पंचायत समितीच्या माध्यमातून राबविली जात आहे. या माध्यमातून शेतीला सिंचनाची शाश्वत सोय व्हावी अशी भूमिका आहे. सिंचनाची सोय नसलेल्या शेतकऱ्यांना यातून पिके जगविता येईल. सोबतच मत्स्य व्यवसायदेखील करता येईल.

# नल दमयंती सागरावर विदेशी पक्षाचा मुक्त संचार

## अप्पर वर्धा जलाशयावर १५१ प्रजातीच्या पक्षांच्या नोंदी

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी**

पश्चिम विदर्भातील सर्वात मोठ्या अशा अप्पर वर्धा जलाशयावर दरवर्षी हिवाळ्यामध्ये विविध प्रजातीचे परदेशी पक्षी हजारो कि. मी.वरून स्थलांतर करून येतात. हे स्थलांतर करत असताना पक्षी हजारो किलोमीटरचा प्रवास करतात. हे पक्षी उत्तर गोलार्धामधून स्थलांतर करून भारतामध्ये येतात.प्रामुख्याने हे हिवाळ्यातील स्थलांतर हवामानातील बदल आणि मुबलक अन्नासाठी केल्या जाते. भारतामध्ये येणारे स्थलांतरित पक्षी मंगोलिया, सायबेरिया, रशिया , उझबेकिस्तान आणि कझाकिस्तान तसेच युरोपातील देशामधून या जलाशयावर स्थलांतर करतात. या पक्षांमध्ये प्रामुख्याने राजहंस, कलहंस, चक्रवाक, तलवार बदक, थापट्या बदक, तरंग बदक, भुवई बदक तसेच युरोपातील काही देशांमधून काळा करकोचा, कुरव, सुरय,मोर शराटी भारतामध्ये



येतात. राजहंस व कलहंस हे पक्षी मंगोलियातून सुमारे ३००० ते ४००० किलोमीटरचे प्रवास करून महाराष्ट्र मध्ये दाखल होतात. राजहंस पक्षी हिमालयाच्या उंच शिखरावरून म्हणजेच २१४६० फुटावरून भरारी घेऊन भारतामध्ये दाखल होतात.

विशेष म्हणजे या जलाशयावर विणीच्या हंगामात ऑस्ट्रेलियातून प्राच्य आर्ली, छोटा आर्ली तसेच दक्षिण भारतातील काही भागातून निळ्या शेपटीचा राघू मोठ्या संख्येने विण करण्यासाठी जलाशयातील परिसरामध्ये दरवर्षी येतात.

तसेच पश्चिमेकडील समुद्रपक्षी त्यामध्ये पानचिरा, सुरय पक्षाच्या अनेक प्रजाती,कुरव पूर्वेकडील समुद्र भागामध्ये जात असताना महत्त्वाचा थांबा म्हणून या जलाशयाचा वापर करतात. विशेष म्हणजे सायबेरियातून अनेक प्रकारचे चिखल पक्षी, तसेच काळ्या शेपटीचा पाणटीवळा, पाच हजार किलोमीटरचा प्रवास करून भारतामध्ये दाखल होतात.

या संदर्भातील संशोधन प्रा.अश्विन लुंगे, श्री.आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय मोर्शी तसेच प्रा.डॉ. गजानन वाघ, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती यांनी केलेल असून नुक्ताच १५१ प्रजातींच्या पक्षाच्या नोंदी घेतलेला शोध निबंध बायोलॉजिकल रिसर्च कम्युनिकेशन या जर्नल मध्ये प्रकाशित झाला आहे . विशेष म्हणजे पांढ्या माथ्याचा कलहंस या पक्षाची नोंद प्रथमच या जलाशयावर घेण्यात आली आहे. आय.यु.सी. एन. रेड लिस्ट नुसार संकटग्रस्त असलेले एकूण नऊ पक्षी-प्रजाती या जलाशयावर आढळून येतात.अप्पर वर्धा जलाशय स्थलांतरित व स्थानिक पक्षांच्या अधिवासाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे.

# विद्यार्थ्यांपेक्षा शिक्षकच अधिक बेशिस्त! उपसभापतींची शिक्षक आमदारांना समज

**दि. ४विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

सभागृहात बोलण्याची संधी मिळावी म्हणून एकाच वेळी अनेक शिक्षक आमदारांनी मागणी केल्याने विधान परिषदेत गोंधळाची स्थिती निर्माण झाली. पीठासीन अधिकारी डॉ नीलम गोऱ्हे यांनी सदस्यांना शांत राहण्याचे आवाहन केले. मात्र त्यानंतरही स्थिती कायम कायम राहिल्याने. विद्यार्थ्यांपेक्षा शिक्षक (आमदार) अधिक बेशिस्त! अशा शब्दांत उपसभापतींनी शिक्षक आमदाराना समज दिली. विधानपरिषदेत राष्ट्रवादीचे( अजित पवार) विक्रम काळे यांनी शिक्षकांचा प्रश्न मांडला. त्यावर कपील पाटील यांनी मुद्दा मांडला. मंत्र्यांनी या प्रश्नाला सविस्तर उत्तर दिले. त्यामुळे या प्रश्नावर चर्चा बरीच लांबली. तरीही एकामागून एक शिक्षक सदस्य बोलण्याची संधी मागत होते. प्रश्नावर पुरेशी चर्चा झाली असल्याने आता अधिक नको, इतर प्रश्न महत्त्वाचे आहे, असे उपसभापती यांनी सांगितले. मात्र, सदस्यांचे समाधान झाले नाही. त्यांनी बोलण्याचा आग्रह कायम ठेवला. त्यामुळे सभागृहात गोंधळाची स्थिती निर्माण झाली.

# अण्णा हजारे यांना लोकं दुसरे गांधी म्हणतात हे हास्यास्पद : जितेंद्र आव्हाड

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

समाजसेवक अण्णा हजारे यांना लोक दुसरे महात्मा गांधी म्हणतात, हे हास्यास्पद असून त्यांनी माहिती अधिकार कायदा आणण्यासाठी आणि अंमलबजावणीसाठी काही प्रयत्न केल्याचे कुठल्याही प्रकारचे पुरावे उपलब्ध नाही. तसेच अण्णा हजारे यांच्या मुळे जनलोकपाल, लोकायुक्त कायदा अंमलात आला हे देखील सपशेल खोटं आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी कळविले आहे.





या माणसामुळे म्हणजेच अण्णा हजारे यांच्या मुळे देशाचं वाटोळं झालं, गांधी टोपी घातली म्हणून कोणी गांधी होत नाही, असे बदनामीकारक वक्तव्य ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचा फोटो प्रसिद्ध करून आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून केले होते. अण्णा हजारे यांची बदनामी केली म्हणून अण्णांचे वकील ॲड. मिलिंद द. पवार यांनी अण्णा हजारे यांच्या वतीने अण्णांची बदनामी केल्याबद्दल जितेंद्र आव्हाड यांना कायदेशीर नोटीस बजावली होती. ॲड. पवार यांच्या कायदेशीर नोटिशीला जितेंद्र आव्हाड यांनी त्यांच्या वकीलांमार्फत उत्तर दिले आहे.

जितेंद्र आव्हाड हे त्यांच्या उत्तरातून म्हणतात की, अण्णा हजारे हे दुसरे गांधी आहेत असं लोकं म्हणतात, हे हास्यास्पद आहे. तसेच माहिती अधिकार कायद्याच्या अंमल बजावणीसाठी किंवा कायदा आणण्यासाठी अण्णा हजारे यांनी काही प्रयत्न केल्याचे कुठल्याही प्रकारचे पुरावे उपलब्ध नाहीत. तसेच जनलोकपाल, लोकायुक्त कायदा अण्णा हजारे यांच्या आंदोलनामुळे आला हे खोटे असुन, जनलोकपालसाठी अनेक आंदोलनं झाले. त्यामध्ये अनेक लोकं होते. त्यापैकी अण्णा हजारे हे एक व्यक्ती म्हणून हजर होते. अण्णा हजारे स्वत:ची प्रतिष्ठा व प्रतिमा उंचावण्यासाठी स्वत:ला दुसरे गांधी म्हणवून घेत आहेत. अण्णा हजारे यांच्यामुळे माहिती अधिकार कायदा अंमलात आला, अण्णा हजारे यांच्या मुळे जनलोकपाल, लोकायुक्त कायदा अंमलात आला हे देखील सपशेल खोटं आहे. त्यामुळे मी काही कोणाची बदनामी केलेली नाही. या माणसामुळे देशाचं वाटोळं झालं हे वाक्य माझे वैयक्तिक मत होते. अण्णा हजारे यांनी ॲड़ मिलिंद पवार यांच्या वतीने पाठवलेली कायदेशीर नोटीस तुम्ही परत घ्यावी. मला तुमच्या नोटीसला कारण नसताना उत्तर देणं तुम्ही भाग पाडले म्हणून तुम्हीच मला १ लाख रुपये द्यावेत. माझ्यावर कुठलीही कायदेशीर कारवाई करू नये. असे उत्तर आमदार जितेंद्र आव्हाड यांनी ॲड़ मिलिंद पवार यांना व अण्णा हजारे यांना पोस्टाने पाठविले आहे. जितेंद्र आव्हाड यांचे हे उत्तर म्हणजे अण्णा हजारे यांचा अपमान व बदनामी करणारे असुन अण्णांशी बोलून पुढील निर्णय घेणार असल्याचे अण्णांचे वकील ॲड. मिलिंद पवार यांनी सांगितले.

# शिवमहापुराण मुख्यकार्यालयात महिला व पुरुष यांची मंडप व्यवस्थापन समितीची हजारोच्या संख्येतमध्ये अंतिम बैठक संपन्न

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

दि.१६ ते २० डिसेंबर २०२३ रोजी दरम्यान शिवमहापुराण कथेच्या ठिकाणी मंडप व्यवस्थापन व्यवस्थेसंबधी विविध विषयांवर झाली चर्चा -१४ डिसेंबर रोजी हनुमानगढी येथे मंडप समिती सदस्यांना दोन तासाच्या डेमो नंतर कोडनुसार मिळणार आय.डी. मंडप समितीव्दारे सर्व सदस्यांना १४ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता हनुमानगढी येथे उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले.संकल्प बैठकीमध्ये १५ डिसेंबर रोजीच्या कलश यात्रेमध्ये हजारोच्या संख्येने उपस्थित महीलांनी येण्याचा केला. कलश यात्रेमध्ये येणाऱ्या प्रत्येक महीलेला आमदार रवि राणा व खा नवनित रवि राणा यांच्या हस्ते हनुमानगढी येथे होणार.



व्हि.व्हि.आय.पी गोल्डन पासचे वितरण अमरावती - हनुमान चालिसा चॅरीटेबल ट्रस्टच्या वतीने दि.१५ ते २० डिसेंबर २०२३ रोजी आयोजीत हनुमानगढी शिवमहापुराण कथेची तयारी जोमाने सुरु असुन त्या संदर्भात राजकमल चौक,अमरावती येथील शिवमहापुराण कथेच्या मुख्यकार्यालयात विविध समितीच्या रोज बैठकी सुरु असुन त्या अनुषंगाने आज मंडप व्यवस्थापन समितीची महिला व पुरुषांची हजारोच्या संख्येची अंतिम बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये कार्यक्रमाच्या स्थळी सेवा देण्याच्या उद्देशाने प्रत्येक सदस्याला आय.डी. कार्ड देण्यासंदर्भात अंतिम स्वरुप देण्यात आले त्यानुसार १४ डिसेंबर रोजी प्रत्येक मंडप समिती सदस्याने दुपारी २ वाजता हनुमानगढी येथे उपस्थित राहावे असे सांगण्यात आले आहे. यावेळी मंडपामध्ये दोन तासांचा डेमो घेण्यात येणार असुन त्यानंतर प्रत्येक सदस्याल्या त्यांना दिलेल्या कोड नं. नुसार आय.डी कार्डचे वितरण करण्यात येत असल्याचे या बैठकीत स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे प्रत्येक सदस्याने आवर्जुन उपस्थित राहण्याचे आव्हाहन मंडप समितीव्दारे करण्यात आले. यावेळी निळकंठराव कात्रे, समाजसेवक चंद्रकुमार उर्फ लपी जाजोदिया, सुनिल राणा, मिरा कात्रे, अनुपमा राणा, ज्योती सैरीसे, सुमती ढोके, विनोद गुहे, विरेंद्र उपाध्याय, अजय मोर्या, चंदा लांडे, सुधा तिवारी, सारीका मिश्रा, मित्तल तिवारी,अंजाबराव पडोळे, अनुपमा खंडेलवाल, आशिष महाजन, संतोष साहु, अशोक जाजु, दिपेश मिश्रा, काजल तिवारी, किरण वैष्य, मिनाक्षी जैन, मिश्राजी, पुजा खंडेलवाल, प्रगती बोज्जे, प्रिती मकवाना, प्रगती ढोले, राज तिवारी, सरीता भारा, श्वेता मिश्रा, श्यामभाऊ, उज्वला पांचडे, वर्षा चांडक, योगीता दिदि, अमित मंत्री, साहील खंडेलवाल, सारडाजी, बबीता अजबे, जयश्री चांडक, कल्पना शर्मा, आनंद जयस्वाल, राकेश चौबे, अर्चना तालन, नंदा सावदे, जया तेलखडे, समिक्षा गोटेफोड, निता खडसे, रेखा संभे,मुकेश वासेवाय, सिध्दी विनायक धानोरकर, संतोषसिंग ठाकुर, कविता पालीवाले, मनोहर भोपळे, योगीता भद्रे, सिमा पच्चीवार, आचल कलंत्री, अंजली सुर्यवंशी, चंदन सुर्यवंशी, जिग्नेश ठवकर,विनिता साहु, विद्या तिवारी, संगिता काळपांडे, निता खडसे आदि महिला व पुरुष उपस्थित होते.

# विद्यापीठातील पदव्युत्तर शिक्षण विभागात संभाषण कौशल्य व सायबर क्राईम जागृती कार्यशाळा संपन्न



**दि.१४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर शिक्षण विभागात संभाषण कौशल्य व सायबर क्राईम यावर नुकतीच कार्यशाळा संपन्न झाली. संभाषण कौशल्य या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत, प्रमुख वक्ते म्हणून श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय अमरावतीच्या डॉ. संगीता बिहाडे, डॉ. वैशाली कडू यांची उपस्थिती होती. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात डॉ. वैशाली कडू यांनी संप्रेषण म्हणजे काय? दैनंदिन जीवनात संभाषणाचे महत्त्व, प्रभावी संभाषण कौशल्य, श्रवण, भाषण, वाचन, लेखन यावर मार्गदर्शन केले. दुस-या सत्रात डॉ. संगीता बिहाडे व डॉ. वैशाली कडू यांनी विविध उपक्रम तसेच खेळाच्या माध्यमातून प्रभावी संप्रेषण कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले.

दीपप्रज्वलनाने कार्यशाळेची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक डॉ. कविता मेशकर, सूत्रसंचालन सुमित भगत, तर आभार कु. वैशाली तारेकर यांनी मानले. सायबर क्राईम जनजागृती कार्यशाळेला प्रमुख वक्ते म्हणून आकाशवाणी अमरावतीचे प्रकल्प सल्लागार व उद्घोषक श्री ममेश माथनकर उपस्थित होते. श्री माथनकर यांनी सायबर गुन्हा म्हणजे काय? सायबर गुन्हाचे स्वरूप, प्रकाराची विविध उदाहरणाद्वारे माहिती देऊन अशा गुन्हाची नोंद कशी करावी, तक्रार कोठे करावी, अशा गुन्हांना आळा कसा घालता येईल, यासाठी काय दक्षता घ्यावी यासंदर्भात विस्तृत मार्गदर्शन केले.

# पीएचडी प्रकरणावर अजित पवारांनी केली दिलगिरी व्यक्त

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राज्य विधिमंडळाच्या यंदाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान मराठा आरक्षण आणि शेतकऱ्यांचे मुद्दे गाजत आहेत. तसंच अधिवेशनात काँग्रेस नेते आणि आमदार सतेज पाटील यांनी उपस्थित केलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या एका वक्तव्यानेही प्रचंड गदारोळ झाला. पीएचडी करून तरुण काय दिवे लावणार आहेत, असं अजित पवार यांनी म्हटलं होतं. अजित पवारांच्या या वक्तव्यानंतर राज्यभरात विद्यार्थी आक्रमक झाले आणि विरोधी पक्षातील नेत्यांनीही त्यांच्यावर निशाणा साधला. या पार्श्वभूमीवर आपल्या वादग्रस्त वक्तव्याबद्दल अजित पवारांनी दिलगिरी व्यक्त केली आहे.



पीएचडीबाबत माझा तोंडातून 'काय दिवा लावला जाणार' असा शब्द गेला . त्याचा प्रचंड गाजावाजा करण्यात आला. त्याबाबत मी दिलगिरी व्यक्त केली आहे, असं अजित पवार यांनी आज म्हटलं. तसंच अनेकांनी राजकीय नेत्यांवर पीएचडी केली. पीएचडी करण्याबद्दल माझं दुमत नाही. पीएचडीबाबत विषय निवडीसाठी समिती नेमायला हवी. अनेक जण विविध विषयात पीएचडी करतात. जर्मन भाषेत पीएचडी केली तर अधिक फायदा होईल, असंही अजित पवार यावेळी म्हणाले.

### विरोधकांनी केली होती घणाघाती टीका

अजित पवार यांच्या वक्तव्यानंतर विरोधी पक्षातील अनेक नेत्यांनी आक्रमक शब्दांत टीका केली होती. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अजित पवारांवर टीका करताना म्हटलं होतं की, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे उच्च शिक्षणाबद्दल हे वक्तव्य म्हणजे हा भाजपाप्रणित सरकारचा माज दर्शवतो. या माजुरड्या सरकारचा निषेध, अशा शब्दांत पटोले यांनी आपला संताप व्यक्त केला होता. दरम्यान, अजित पवार यांच्या वक्तव्याच्या निषेधार्ह कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठासमोर पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी निदर्शने केली होती. अखेर आता अजित पवार यांनी याप्रकरणी दिलगिरी व्यक्त केल्यानंतर या वादावर पडदा पडण्याची शक्यता आहे.

# अर्थसंकल्पापूर्वी जुनी पेन्शन; उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

जुनी पेन्शनसंदर्भात कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत काल बैठक झाली. त्यात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मुख्य सचिव होते. मुख्यमंत्र्यांनी जुनी पेन्शनबाबत सकारात्मकता दर्शविली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना दिली.



सहाय समितीचा अहवाल आला आहे. या अहवालाचे सरकारने वाचन केलेले नाही. त्यानंतर अहवाल पटलावर ठेवण्यात येईल. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती कर्मचारी संघटनांशी चर्चा करतील. केंद्र सरकारनेदेखील एक अभ्यास समिती गठीत केली आहे. पण, त्यांच्याशी आम्ही लिंकअप करणार नाही. आपल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन मिळावी, यासाठी सरकार निश्चितपणे सकारात्मक निर्णय घेईल. २०३१-३२ पासून जुनी पेन्शनची अंमलबजावणी होणार आहे. त्यांचे काही मुख्यमंत्र्यांनी निकाली काढले. कर्मचाऱ्यांचा आग्रह आहे की सरकारने तत्काळ निर्णय घ्यावा. मात्र, आम्ही संप मागे घेण्याचे आवाहन केले असून चर्चेतून यावर तोडगा निघेल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. याप्रसंगी त्यांनी पीएचडीबाबत मी जे बोललो त्याचा विपर्यास करण्यात आला. मी त्याबाबत दिलगिरी व्यक्त करतो. मात्र, काही संशोधक नेत्यांवर पीएचडी करताहेत, असे होऊ नये. पीएचडी करताना विषयाचे गांभीर्य असायला हवे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# संसदेतल्या राड्याचे महाराष्ट्रात पडसाद

## आजपासून प्रत्येक आमदाराला जास्तीत जास्त दोन पासेस

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा आजचा (१३ डिसेंबर) १० वा दिवस आहे. आज लोकसभेचं कामकाज सुरू असताना मोठा गोंधळ पाहायला मिळाला. दोन अज्ञात व्यक्तींनी प्रेक्षक गॅलरीतून सभागृहात उड्या मारल्या. खासदारांच्या बाकांवरून उड्या मारत हे दोघेजण लोकसभा



अध्यक्षांच्या खुर्चीच्या दिशेने धावत होते. दरम्यान, अनेक खासदारांनी या दोन इसमांना घेरलं. त्याचवेळी या दोघांनी त्यांच्या बूटातून स्मोक कॅन बाहेर काढले आणि सभागृहात धूर केला. सुरक्षा व्यवस्था भेदून हे दोघे सभागृहापर्यंत पोहोचल्याने सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात आहे.

दरम्यान, संसदेत घडलेल्या या घटनेचे महाराष्ट्राच्या विधानसभेतही पडसाद उमटले. नागपूर येथे महाराष्ट्र विधीमंडळाचं अधिवेशन सुरू आहे. अधिवेशनादरम्यान, माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस आमदार पृथ्वीराज चव्हाण यांनी संसदेतल्या सुरक्षा व्यवस्थेचा मुद्दा मांडला. तसेच आपणही काळजी घ्यायला हवी असं म्हणाले. त्यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले, मीसुद्धा वारंवार सर्व सदस्यांना विनंती केली आहे की आवश्यक असतील तेवढेच व्हिजीटर्स पास काढून घ्या. कोणीही अधिक पासेसची मागणी करू नका.

विधानसभा अध्यक्षांच्या प्रतिक्रियेनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील हाच मुद्दा मांडला. तसेच पवार म्हणाले, माझी विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषदेच्या सभापतींना विनंती आहे की, आपण विधीमंडळाचे पासेस कमी करायला हवेत. अजित पवार यांच्या मागणीनंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले, मी जाहीर करत आहे की आजपासून प्रत्येक आमदाराला जास्तीत जास्त दोन पासेस दिले जातील. त्याव्यतिरिक्त तिसरा पास दिला जाणार नाही.




# तुषार भारतीय मित्र मंडळच्या वतीने उद्यापासून तीन दिवसीय अमृतमंथन व्याख्यानमालाचे आयोजन

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

सामाजिक न्यायाचे क्रांतिकारक विचार जनमानसात रुजावे या उद्देशाने तुषार भारतीय मित्र मंडळाच्या वतीने अमृतमंथन हि तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोगानं १५ ते १७ डिसेंबर २०२३ रोजी सायं ६:३० साईरत्न लॉन , साई मंदिराजवळ , साई नगर , अमरावती येथे होणारी व्याख्यानमाला होणार आहे .

अमृतमंथन हि प्रबोधन करण्याच्या उद्देशाने मागील एकरा वर्ष सुरु असलेली व्याख्यानमाला यावर्षी प्रसिद्ध व्याख्याते अमृतवक्ता विवेक घळसासी प्रमुख वक्ते राहणार आहे. दि १५ डिसेंबर रोजी शक्तीस्तंभच उध्वस्त होत आहे!तर , दि १६ डिसेंबर रोजी जेथे आहोत तेथे सैनिक बनू या ! तर दि १७ डिसेंबर रोजी सनातन धर्माचे संविधान : पसायदान या विषयावर अमृतवक्ता श्री विवेक घळसासी व्याख्यान देणार आहे .व्याखानमलेला यापूर्वी सिने अभिनेता राहुल सोलापूरकर , सिने अभिनेत्री निशिगंधा वाड , सौ धनश्री लेले , विश्वबरं चौधरी , भाजप प्रवक्ते माधव भंडारी , सौ पूर्णिमा सवाई , अरविंद देशमुख, स्व .सुमंत टेकाडे आदींनी हजेरी लावली होती. अमृतमंथन या तीन दिसशीय व्याखानमालेला मोठ्या संख्येने उपस्तित राहण्याचे आवाहन भाजप नेते तुषार भारतीय व मित्र मंडळ यांनी केले आहे.

# तहसील कार्यालयासमोर सुरज कारंजेकर यांचे उपोषण सुरू

## तीर्थक्षेत्र देऊरवाडा येथील अतिक्रमण काढण्याची मागणी



**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक चांदूर बाजार**

तालुक्यातील देऊरवाडा येथील ऐतिहासिक महानुभाव पंथाचे श्रध्दास्थान श्री चक्रधर स्वामी चरणांकित तिर्थस्थान तसेच सिध्देश्वर मंदीर, ज्योतीर्लिंग, चक्रतिर्थ ,दामोर्थराजाच्या राजवाडा, त्रिवेनी संगम तसेच स्मशान भुमी कडे जाणाऱ्या रस्त्यावर, देवी नगर येथील लोकांनी अतिक्रमण केले असून त्या रस्त्यावरील अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे ,या मागणीसाठी सुरज कारंजेकर यांनी तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. देऊरवाडा ही विदर्भातील छोटीशी असून या ठिकाणी लाखो भक्तजन येत असतात. या ठिकाणी पूर्णा मेघा व गुप्त स्वरूपाने पैष्णवी असे त्रिवेणी नदीचा संगम आहे. या नदीच्या काठावर अनेक धार्मिक मंदिरे असल्यामुळे दरवर्षी लाखो भक्त संगमावर आंघोळीसाठी येत असतात. अधिक महिन्यात या संगमावर संपूर्ण विदर्भातून भाविक मंडळी देवदर्शन व आंघोळीसाठी येत असतात. या ठिकाणी पूर्णा ही उत्तरवाणी असल्यामुळे या नदीचे महत्व अधिक असून भाविक भक्त या ठिकाणी दशक्रिया, पिंडदान यासारख्या कार्यक्रमासाठी सुद्धा वर्षभर या संगममावर गर्दी असते. या ठिकाणी जाणाऱ्या मार्गावर आज अतिक्रमण झाले असून, त्यामुळे भाविक भक्तांना जाण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे. त्यांना आपले वाहन नेण्यासाठी व पार्किंग करण्यासाठी जागा नसल्याने मोठा अडथळा निर्माण होत आहे. पूर्वी नदीच्या काठावर श्रद्धाळू आपले वाहने उभी करत होती. परंतु आता त्या जागेवर काही लोकांनी अतिक्रमण केल्यामुळे वाहने उभी करण्यात जागाही राहिली नाही. त्यामुळे त्या रस्त्यावरील अतिक्रमण काढणे , रस्त्यावरचे सांडपाणी नाल्यात काढणे,रस्त्यावरील खताचे ढीग बाजुला करणे ,रस्त्यावरील हागंदारी मुक्त करणे,नदिवर येणाऱ्या रसत्यावर अंधार असल्यामुळे पुराच्या पाण्याचा अंदाज लागू न शकल्यामुळे जिवीताचा धोका टाळण्यासाठी नदी पात्रावरील दोन्ही बाजुने हॉयमॅक्स बसवि, येणाऱ्या भाविक भक्तांच्या गाडी पार्कीग साठी जागा मोकळी करून देणे.

# गाडगे बाबांचे आचार विचार आचरणात आणण्याची नितांत गरज : देविदासजी पवार

## श्री गाडगे महाराज तुमच्या ६७ व्या पुण्यतिथी महोत्सवाचा शुभारंभ

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

श्री संत गाडगे महाराज यांचे विचार आचार अमलात आणण्याची नितांत गरज असल्याचे मत महानगरपालिका आयुक्त देविदासजी पवार यांनी केले ते श्री गाडगे महाराज समाधी मंदिर गाडगेबाबा नगर अमरावती येथील श्री गाडगे महाराज पुण्यतिथी महोत्सव शुभारंभ च्या निमित्ताने ते बोलत होते पुढे बोलताना ते म्हणाले की गाडगे महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव या निमित्ताने गाडगे महाराजांचे स्वच्छता अभियान संपूर्ण महाराष्ट्रभर राबवल्या जाते व त्यामुळे गाडगेबाबांच्या कार्याची ओळख मला झाली मी आयुक्त यवतमाळ ला असताना त्या ठिकाणी पुरस्कार मिळाला हे माझे भाग्य आहे व




त्यानंतर मी आज महानगरपालिकेच्या आयुक्त पदी नियुक्त झालो आज मला समाधी मंदिरावर कलश स्थापना पूजा करण्याचा योग आला मी धन्य समजतो असेही पवार साहेब म्हणाले पुढे बोलताना त्यांनी गाडगे महाराजांच्या समाधी मंदिरावर विशेष लक्ष ठेवून त्यांच्या गरजांची मी जाणीव ठेवेल असे ते बोलताना म्हणाले संस्थेचे विश्वस्त तथा गाडगे महाराज मिशन मुंबईचे उपाध्यक्ष बापूसाहेब देशमुख केलेल्या सूचनाप्रमाणे सर्वप्रथम कलश पूजन प्रतिमापूजन व ग्रंथ पूजन पवार साहेब यांच्या व त्यांच्या मातोश्री श्रीमती गिरजाबाई गंगाधरराव पवार यांच्या हस्ते पूजन संस्थेचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख उपायुक्त भूषण पुसदकर, माजी नगरसेवक बाळासाहेब भुयार, माजी नगरसेवक प्रदीप जी बाजड, डॉ. राजकुमार लंगडे , भरत भाऊ रेडे, डॉ. अमोल कुमार ठवळी , रघुनाथराव रोडे, डी एन कुर्वे, कुणाल देशमुख नाशिक, वाहन चालक मुन्ना भाऊ शुक्ला हरीश इंगळे यांच्या उपस्थितीत करण्यात आले आज पासून भागवत सप्ताह चे आयोजन करण्यात आल्याने ह भ प पंकज महाराज पोहकार यांचे श्रीमती गिरजाबाई पवार यांच्या हस्ते पूजन तथा पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले त्यानंतर ज्या गाडीमध्ये गाडगेबाबांनी प्रवास केला त्या गाडीचं पूजन सुद्धा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले दिनांक १४ डिसेंबर ते २० डिसेंबर पर्यंत भागवत सप्ताह सुरू राहणार आहे रोज सकाळी साडेदहा ते साडेबारा दरम्यान ज्ञान यज्ञ होणार आहे २१ डिसेंबरला महाप्रसाद भव्य शोभायात्रा काल्याचे किर्तन महाप्रसादाने पुण्यतिथी उत्सव सप्ताहाची समाप्ती होणार आहे वरील कार्यक्रम यशस्वी करण्याकरता संस्थेचे व्यवस्थापक प्रकाश महात्मे, सागर देशमुख ,गजानन देशमुख ,सुधीर घोंगडे ,दिलीप फुके , सतीश टाले, अतुल रेडे ,रामचंद्र पुंड ,प्रभाकर रोडे व इतर यांनी विशेष परिश्रम घेतले या सर्व कार्यक्रमांमध्ये गाडगेबाबांच्या भाविक भक्तांनी उपस्थित राहून संस्थेला सहकार्य करावे असे आवाहनही बापूसाहेब देशमुख विश्वस्त श्री गाडगे महाराज समाधी मंदिर गाडगेबाबा नगर अमरावती यांनी केले आहे

# लसणाचे दर कडाडले, गृहिणींचे किचन बजेट गडबडले

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

टोमॅटो, कांद्यानंतर आता लसणाचे भावही गगनाला भिडले आहे. दररोजच्या जेवणातील भाजीत किंचित पण महत्त्वाचा घटक असलेल्या लासणाला वर्षभर मागणी असतेच. मात्र, अलीकडे लसणाच्या किमती सातत्याने वाढत असल्याने गृहिणींचे किचन बजेट गडबडले आहे.

आजघडीला अमरावती शहरात किरकोळ भाजी बाजारात लसणाची किंमत ३२० ते ३५० रुपये प्रतिकिलोपर्यंत पोहोचली आहे. व्यापाऱ्यांच्या मते, अवकाळी पाऊस आणि खराब वातावरणामुळे पिकाचे नुकसान झाले, याचा उत्पादनावर विपरित परिणाम झाला. शिवाय, आवकही कमी झाली आहे. त्यामुळे लसणाचे दर वाढले असून यापुढे त्यात आणखी भर पडण्याची शक्यता आहे. अमरावती भाजी बाजारात शेजारील मध्यप्रदेश, राजस्थान व गुजरातमधून लसणाची आवक होत आहे. खराब वातावरणामुळे लसणाच्या दर्जावरही फरक पडला आहे. लसणाच्या कमी आवकमुळे मागील काही आठवड्यांत किमतीत मोठी वाढ झाली आहे. व्यापाऱ्यांच्या मते, स्थितीत लवकर सुधारणा होण्याची शक्यता नाहीच. पण जानेवारीच्या शेवटपर्यंत नवीन पीक आल्यावरच या वाढलेल्या किमतींपासून काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो.

# विदर्भातील प्रकल्पग्रस्तांच्या समस्यां संदर्भात १५ जानेवारीला अधिकृत घोषणा - मुख्य मागण्या मान्य

**दि.१४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

विदर्भातील प्रकल्पग्रस्तांच्या विविध महत्त्वपुर्ण समस्यांसाठी विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटना अभिनव पद्धतीने आंदोलने करुन सरकार दरबारी आवाज उठवण्यासाठी गेल्या कीत्तेक वर्षांपासून प्रयत्नरत असुन नुकतेच ७ डिसेंबर पासुन अमरावती ते नागपूर असा १६० की.मी.पायदळ लाँगमार्च विदर्भातील हजारो प्रकल्पग्रस्तांनी विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या वतीनेकाढण्यात आला होताघोषणाबाजी व नारे देत हा लाँगमार्च १२ डिसेंबरला थेट नागपूरच्या विधान भवनावर धडकला ५ ते ६ हजार प्रकल्पग्रस्तांनी नागपूर मधिल ३ की.मी.रस्ता पुर्णपने व्यापून टाकला होता. पोलीसांनी सदर मोर्चा बर्डी गोवारी पुलाजवळ रोखल्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी तिथेच कडकडत्या थंडीत रात्र काढली.न्याय व निर्णय घेतल्या शिवाय माघारी परतणार



नसल्याची भुमीका घेतल्यामुळे प्रशासनाची मोठी दमछाक झाली होती. अखेर धामणगाव व मुर्तीजापुर मतदारसंघाचे आमदार यांनी प्रताप दादा अडसड व हरिष पिंपळे यांनी मा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रकल्पग्रस्तांच्या मोर्चा संदर्भात तात्काळ बैठक आयोजीत करण्यासाठी विनंती केली. व १३ डिसेंबरला विधान वभवनाच्या सभागृह क्रं ३मधे बैठक पार पडली बैठकीला आमदार प्रताप दादा अडसड. जेष्ठ नेते आनंदरावजी अडसूळ आमदार देवेंद्र भुयार माजी आमदार अभिजित अडसूळ शिवसेना जिल्हा प्रमुख अरुण पडोळे संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोजभाऊ चव्हाण सुनील घटाळे डॉ भगवान पंडित नितीन मलमकार आली सभागृहात सुध्दा प्रकल्पग्रस्तांचे मुद्दे मांडले. तसेच अत्यंत सकारात्मक बैठक झाल्यामुळे येत्या १५ जानेवारी २०२४ रोजी निर्णय व गोड घोषणा करणार असल्याचे उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस तथा मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे ना.संजय राठोड यांनी बोलताना व्यक्त केली. या संपूर्ण संस्थापक अध्यक्ष मनोज चव्हाण मुख्य सचिव सुनील घटाळे नितीन मलमकार डॉक्टर भगवान पंडित अजय भोयर गौतम खंडारे प्रशांत मुरादे, अभय जैन भुषण चौधरी, सतीश मेटांगे, महादेवराव ठाकरे,राजु लोनकर, विलासभाऊ गावनेर शंकरराव तायडे, कृष्णराव वानखडे प्रमोद खाडे,डिगांबर महल्ले उपस्थित होते.